Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION


# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2019 Special Issue – 126

# Teaching, Research & Extension in Philosophy : Problems & Prospects



**Guest Editor :**
Dr. Sudhir D. Ingale
I/C Principal
Mudhoji College, Phaltan,
Dist. Satara (MS) India.

**Executive Editors of the Issue :**
Dr. Navnath Raskar
Dr. Sunildatt Gavare

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
Yeola, Dist. Nashik (MS) India.

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

ISSN : 2348-7143
February-2019

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | | Prof. (Dr.) S. M. Bhave | 05 |
| 1 | A Poor, Old, Distant Cousin | Dr.Khalil N. Sayyed | 07 |
| 2 | Impact of Philosophy on Society : An Overview | Dr. Rahul Kapure | 11 |
| 3 | Methods and Techniques for Philosophical Teaching | Dr. Amita Valmiki | 14 |
| 4 | Mystical Philosophy of Karl Jaspers | Mr. Manoj Patil | 18 |
| 5 | Components of Field Work in Research of Social Sciences | Asst. Prof. Rajani A. Kale | 22 |
| 6 | Problems of Extension of Philosophy | Pandharinath Kadam | 26 |
| 7 | Research Manners in Social Sciences | Dr. Ganesh Belambe | 29 |
| 8 | Social Philosophy in Rajarshi Shahu Maharaj | | |
| 9 | Mental Health among Professional and Non-Professional Women: A Clinical Study | Prof. Dr. S. H. Mohite | 32 |
| 10 | A Study of Mental Health among Persons in Swadhyayee and Non-Swadhyayee Pariwar | Dr. Ajit B.Chandanshive | 35 |
| 11 | A Study of Mental Health among Social Media Users and Social Media Non-Users | Dr. Abhimanyu Dhormare | 40 |
| 12 | Health and Psychosocial Problems | Dr. S.D.Patankar | 45 |
| 13 | Youth Suicide In India | Dr. D. P. Pawar | 49 |
| 14 | Study of Social Support and Mental Health of College Students | Dr. Sandip M. Mali | 55 |
| 15 | Psychosocial Problem Occupational stress and Job Satisfaction of Advocates | Dr. Dilip Shivane | 61 |
| 16 | Social & Personality Development in Adolescence with Special Reference to Psychosocial Problems in the Development of Self Concept & Parent-Child Relationship | Mr. Rajratna D. Khillare | 69 |
| 17 | Current Trends in Higher Education | Prof. Munguskar Anil Madhukar | 72 |
| 18 | Social Maturity & Emotional Maturity Among Adolscents | Smt. Manbhav S. D. | 75 |
| 19 | Shopping Mall as an Epitome of Employment | Mr Santosh S. Pawar | 79 |
| 20 | Impact of Humanism in the Untouchable by Mulk Raj Anand and the Color of Water by James Mcbride on the Students : A Comparative Study | Mr. Shinde Ashok Krishna | 82 |
| 21 | नीतिशास्त्र के सिद्धांत : एक विवेचन | डॉ.अतुल महाजन | 88 |
| 22 | पद्धतीशास्त्र : एक तात्त्विक विवेचन | डॉ. मोहित टंडन | 95 |
| 23 | तत्त्वज्ञान परिशीलन | डॉ.शर्मिला वीरकर | 99 |
| 24 | तत्त्वज्ञान विस्तारासाठी कृती कार्यक्रम | डॉ.जयसिंग सावंत | 103 |
| 25 | तत्त्वज्ञान विस्तारासाठी कृती कार्यक्रम | डॉ.बाळासाहेब मुळीक | 107 |
| 26 | तत्त्वज्ञान – अध्ययन-अध्यापन- संशोधन | डॉ.सुधीर पिटके | 115 |
| 27 | तत्त्वज्ञान विस्तारासाठी कृती कार्यक्रम | डॉ.अमन बगाडे | 119 |
| 28 | तत्त्वज्ञानाविषयी विद्यार्थी, पालक, समाज यांची धारणा | डॉ.बालाजी नरवाडे | 123 |
| 29 | तत्त्वज्ञान विस्तारातील अडचणी | प्रा.धनराज हाडुळे | 127 |
| 30 | तत्त्वज्ञानाविषयी विद्यार्थी, पालक, समाज यांची धारणा | प्रा.कामाजी सूर्यकांत | 131 |
| 31 | मानवी जीवनात तत्त्वज्ञानाची आवश्यकता | गंगाधर सोनकांबळे | 133 |

| | | | |
|---|---|---|---|
| 32 | पुस्तक निर्मिती : एक ज्ञानयज्ञ | डॉ.वेदप्रकाश डोणगावकर | 135 |
| 33 | तत्त्वज्ञानाची आवश्यकता | डॉ.सुनिलदत्त गवरे | 139 |
| 34 | तत्त्वज्ञान विषय : वास्तव आणि अपेक्षा | डॉ.ग्यानदेव उपाडे | 143 |
| 35 | तत्त्वज्ञानाविषयी विद्यार्थी, पालक, समाज यांची धारणा व तत्त्वज्ञान विषय वाढविण्यासाठी केले जाणारे प्रयत्न | रोहित गायकवाड | 146 |
| 36 | तत्त्वज्ञानाविषयी विद्यार्थी, पालक, समाज यांची धारणा | डॉ.विजय शेंडगे | 149 |
| 37 | मानवी जीवनात तत्त्वज्ञानाचे महत्त्व, समस्या आणि उपाय | सचिन राजपूत | 153 |
| 38 | तत्त्वज्ञान विस्तारातील अडचणी : भारतीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भात | कु.स्वाती भोंगळे | 157 |
| 39 | तत्त्वज्ञान अध्यापनातील अडचणी व उपाय | प्रा.एस.पी.मुलाणी | 161 |
| 40 | तत्त्वज्ञान विस्तारासाठी कृती कार्यक्रम | डॉ.किरण सावे | 164 |
| 41 | तत्त्वज्ञान विस्तारासाठी कृती कार्यक्रम | डॉ.सचिन खोकले | 167 |
| 42 | तत्त्वज्ञान विस्तारातील अडचणी व उपाय | प्रा.संजय सोनावणे | 170 |
| 43 | तत्त्वज्ञान विस्तारातील अडचणी व उपाय | डॉ.माधव कांबळे | 173 |
| 44 | तत्त्वज्ञान विषयाची सद्यस्थिती व उपाय | प्रा.अर्चना अरसुडे | 176 |
| 45 | तर्कशास्त्राचे मानवी जीवनातील स्थान | डॉ.सुनिल भोईटे | 178 |
| 46 | अध्यापन पद्धती आणि तत्त्वज्ञान अभ्यास | प्रा.मोनालिसा खानोरकर | 182 |
| 47 | तत्त्वज्ञान शिक्षणाची पूर्व अट : मनाची मशागत | डॉ.सुचित्रा नाईक | 186 |
| 48 | तत्त्वज्ञानाच्या अध्यापनासाठी क्रमिक व संदर्भीय साहित्य निर्मिती | डॉ.मुबीन शेख | 191 |
| 49 | तत्त्वज्ञान विस्तारातील अडचणी | डॉ.अनिल शिंदे | 194 |
| 50 | तत्त्वज्ञानाची अध्यापन पद्धती व तंत्र : कांट आणि रसेल संदर्भात थोडक्यात विचार | प्रा.कृष्णात नगरे | 196 |
| 51 | सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती | प्रा.जयश्री शेंडे | 202 |
| 52 | मानवी जीवनातील शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे विचार | गौरी गायकवाड | 207 |
| 53 | महाराष्ट्रातील तत्त्वज्ञानाच्या अध्ययन – अध्यापन विस्तारीकरणातील भाषाविषयक समस्या आणि उपाय | श्रीनिवास हेमाडे | 211 |
| 54 | वैज्ञानिक संशोधनातील अनिवार्य घटक : सिद्धांत कल्पना | प्रा.विलास टिळेकर | 216 |
| 55 | सॉक्रेटीक मेथड –आजच्या काळात तत्त्वज्ञानातील अध्यापन आणि संशोधनाच्या दृष्टीने महत्त्व | डॉ.एन. के. रासकर | 219 |
| 56 | सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती | प्रा.शितल येरुळे | 223 |
| 57 | सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती | प्रा.वैशाली दिवे | 225 |
| 58 | सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धती | डॉ.सखाराम गोरे | 228 |
| 59 | संशोधन विषयाची निवड व महत्त्व | डॉ. प्रभाकर कीर्तनकार | 233 |
| 60 | संशोधन प्रक्रिया : एक दृष्टीक्षेप | श्री विनोद पाटील | 235 |
| 61 | संशोधनातील समस्या निवडीचे महत्त्व | डॉ. तेजश्री रायते | 238 |
| 62 | समाजशास्त्रीय संशोधनातील अडथळे व उपाय | प्रा. हरिदास गावीत | 241 |
| 63 | संशोधनाचे स्वरूप आणि पद्धती | प्रा. संदीप चपटे | 244 |
| 64 | सामाजिक शास्त्र संशोधनातील गुणात्मक अहवाल लेखनाचे महत्त्व | दिनेश शेळके | 248 |
| 65 | सामाजिक संशोधनातील प्रश्नावलीचे महत्त्व | प्रा. एस. डी. पवार | 252 |
| 66 | इतिहास संशोधनातील एक नवीन विचारप्रवाह सबाल्टर्न इतिहास (वंचितांचा इतिहास) | डॉ. संतोष कदम | 256 |
| 67 | संदर्भ सूची व्यवस्थापन | डॉ. जी. पी. वायकोस | 261 |

| | | | |
|---|---|---|---|
| 68 | ग्रंथालय आणि माहितीशास्त्रात संशोधनाचे महत्त्व | प्रा. आनंद पवार | 264 |
| 69 | शालेय स्तरावरील खेळाडू आणि बिगर खेळाडू विद्यार्थ्यांच्या समायोजनाचा तुलनात्मक अभ्यास | श्री संदीप खिलारे | 267 |
| 70 | मनोसामाजिक समस्या व विकासाच्या अवस्था | प्रा. व्ही. बी. अडसरे | 271 |
| 71 | जुन्नर तालुक्यातील नोकरदार व व्यावसायिक व्यक्तींच्या विविध मूल्यांचा तुलनात्मक अभ्यास | प्रा. जावेद शेख | 274 |
| 72 | महाराष्ट्राच्या ग्रामीण नेतृत्त्वाचा अभ्यास | मदन जहांगीर पाडवी | 279 |
| 73 | संशोधन विषयाची निवड व महत्त्व | डॉ. साहेबराव सातपुते | 283 |


*इस अंक के सभी अधिकार प्रकाशकने आरक्षित किए है। प्रकाशित आलेख पुन:प्रकाशित करने से पहले प्रकाशक एवं लेखक की संयुक्त लिखित अनुमती जरुरी है। प्रकाशित आलेखो में व्यक्त मंतव्य केवल लेखक के है, इन मंतव्य से संपादक और प्रकाशक सहमत हो, यह जरुरी नहीं है। आलेख के संदर्भ में उपस्थित कॉपीराईट* ***(Originality of the papers)*** *की जिम्मेवारी स्वयं लेखक की है।*

RESEARCHJOURNEY

ISSN : 2348-7143
February-2019

# तत्त्वज्ञानविषयी विद्यार्थी, पालक, समाज यांची धारणा व तत्त्वज्ञान विषय वाढविण्यासाठी केले जाणारे प्रयत्न

रोहित सुधाकर गायकवाड
सहाय्यक प्राध्यापक, तत्त्वज्ञान विभाग
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर

तत्त्वज्ञान हा विषय जरी सर्व शास्त्राची जननी आहे. असे आपण विद्यार्थांला सांगत असतो परंतू आज ही जननीच त्यांच्या पाल्यापेक्षा किती तरी मागे गेलेली दिसून येते. तत्त्वज्ञान हा विषय मी घेतला आहे. असे जर एखादया विधार्थीने इतरांना सांगितले कि समोरच्याच्या भुवया उंचावतात कारण, त्याचा असा गैरसमज घेवून बसलेला आहे की, तत्त्वज्ञान हा विषय खूप अवघड असतो. किंवा या विषयाचा पुढे काय फायदा हा विषय स्पर्धा परिक्षेला कुठे असतो का? इ. नानाप्रकारचे प्रष्न समोरील व्यक्तीच्या मनामध्ये निर्माण होतात व असे प्रष्न विद्यार्थी, पालक व समाजाच्या देखील मनामध्ये असतात व त्यामुळे आज तत्त्वज्ञान विषयाची ओळख एक अल्पसंख्यांक विषय म्हणून घेऊन बसली आहे. हा विषय तसे पाहिले तर मनुष्याला एक जीवन जगण्याची दृष्टी देणारा विषय आहे. हा विषय अल्पसंख्यांक किंवा या विषयाबद्दलाची विद्यार्थी, पालक व समाज यांच्या मनात या विषयी जो गैरसमज आहे. तो कष्यामुळे आहे व तो गैरसमज कसा दुर होईल ते मी माझ्यापरीने मांडणार आहे.

**तत्त्वज्ञान विषयाबद्दल विद्यार्थी, पालक व समाज यांचा गैरसमज तत्त्वज्ञान विषयाबद्दल विद्यार्थ्यांची धारणा.**

तत्वज्ञान हा विषयच महाराष्ट्राच्या बोटावर मोजण्या इतपत काही कनिष्ट महाविद्यालय व काही वरील महाविद्यालयामध्ये आहे. त्यामुळे तत्त्वज्ञान या विषयाचे नावच विद्यार्थी ज्यावेळी तो कनिष्ट महाविद्यालयात प्रवेष घेत असतो तो या विषयाचे नाव प्रथमतः ऐकतो किंवा एखादा विद्यार्थी वरीष्ठ महाविद्यालयात प्रवेष घेत असतो त्यावेळी त्या महाविद्यालयात तो विषय असेल तर त्याला तत्त्वज्ञान असा विषय असतो हे कळते याचे कारण कि शालेयस्तरावर म्हणेज दहावीपर्यंत सर्वच सामाजिक शास्त्राची विद्यार्थीला तोंड ओळख झालेली असेल परंतू सर्व शास्त्राची जननी म्हणजे तत्त्वज्ञान या विषयाचा कोठेही उल्लेख आलेला नसतो. त्यामुळे हा विषय विद्यार्थी घेण्यास घाबरतात व घेतल्यांनंतर देखील त्यांना इतर विषयांच्या तुलनेत हा विषय अवघड वाटतो त्याचे कारण इतर सामाजिक शास्त्र हे वस्तुनिष्ठ स्वरूपाची आहेत.

तत्त्वज्ञान हा विषय वस्तुनिष्ठ नसून विष्लेषणात्मक स्वरूपाचा आहे. त्यामुळे तो विद्यार्थ्यांला अवघड जातो. तसा पाहिले तर हा विषय विद्यार्थाला वाक्चातुर्थ माणसाला एक वैचारिक, तात्विक दृष्टी देणारा विषय बनवणारा विषय आहे. पण तो विद्यार्थ्यांना इतर विषयांच्या तुलनेत कमी महत्वाचा वाटतो.

**तत्त्वज्ञान विषयाविषयी पालकाची धारणा/गैरसमज**

तत्त्वज्ञान विषयाषी पालक देखील थोडे उदासीन असतात. कारण त्यांना त्यांच्या पाल्यांना फक्त जो सर्व विद्यार्थी विषय घेतात तोच आपल्या देखील पाल्याने घेतला पाहीजे असा त्यांचा आग्रह असतो. कला या शाखेमध्ये त्यांच्या पाल्यांनी इतर सामाजिक शास्त्र हा विषय घ्यावा असे त्यांना वाटते. कारण त्यांची अषी धारणा झालेली आहे की, हा विषय एम. पी. एस. सी. यु. पी. एस. सी. ठिकाणी नसतो किंवा शालेय स्तरावर देखील नसतो.

**समाजाची तत्त्वज्ञान विषयाविषयीची धारणा/गैरसमज**

सर्वसाधारणपणे तत्त्वज्ञान हा विषय खुप कमी महाविद्यालयात असल्यांने सहाजिकच समाजामध्ये देखील या विषयाचे महत्व फारसे दिसत नाही. हा विषय काय उपयोगाचा आहे समाजासाठी याचा काय उपयोग असे अनेक प्रष्न सामाजिक असतात. मानसिकतेत तत्त्वज्ञान विषयांबद्दल विद्यार्थी, पालक यांचा गैरसमज दुर करून तत्वज्ञान विषयाबद्दल आवड निमार्ण करता येते.

**विद्यार्थीच्या मनातील तत्त्वज्ञान विषयाबद्दलचा गैरसमज कसा दुर केला जाऊ शकतो.**

ज्या महाविद्यालयामध्ये कनिष्ठ महाविद्यालय आहे तेथील विद्यार्थीला तत्त्वज्ञान विषय जास्तीत जास्त घ्यायला लावणे त्यांना त्या विषयाचे महत्व पटवून द्यावे व वरिष्ठ महाविद्यालयामध्ये देखील त्याच पध्दतीने करावे विद्यार्थीना अधिक सोप्या पध्दतीने हा विषय शिकवावा व तत्त्वज्ञान विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांना सतत तत्वज्ञान विषयक माहिती सांगावी किंवा त्यांना नेहमी तत्त्वज्ञानात्मक परिषदेमध्ये शिक्षकांनी घेऊन जावे तसेच महाविद्यालयामध्ये देखील तत्त्वज्ञान विषयाशी निगडीत निंबध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा अशा स्पर्धेचे आयोजन करावे जेणेकरून ते नेहमी कार्यशील राहतील व त्याचबरोबर तत्त्वज्ञान विषयाचे अभ्यास मंडळ स्थापन करून त्याद्वारे तत्त्वज्ञान दिवस गेस्ट लेक्चर इ. ठेवावे त्यामुळे विद्यार्थीची तत्त्वज्ञानविषयाबद्दल आस्था वाटेल. व त्याचबरोबर विद्यार्थांना हे समजून सांगावे की, तत्त्वज्ञान हा विषय यु. पी. एस. सी. साठी आवश्यक आहे कारण यु. पी. एस. सी. मध्ये मुख्य विषय म्हणून तत्त्वज्ञान विषय घेतल्यामुळे जास्त यश मिळू शकते. महाविद्यालयामध्ये नेहमी तत्वज्ञान विषयाशी संबंधीत लहान मोठे कार्यक्रम घ्यावे व त्या कार्यक्रमामध्ये त्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे द्यावीत त्यामुळे देखील त्यांचे तत्त्वज्ञान विषयाबद्दल प्रेम वाढेल.

**पालकांच्या मनातील तत्वज्ञानविषयाचा गैरसममज दुर केला जाऊ शकतो.**

पालकांना देखील शिक्षकाने तत्त्वज्ञान विषयाचे महत्व पटवून द्यावे त्यांना सांगावे की, हा विषय तुमच्या पाल्याला एक माणूस म्हणून जीवनात यशस्वी करील कारण या विषयामुळे विद्यार्थ्यांचा आत्मीक विकास होतो व त्याचबरोबर हा विषय विश्लेषणात्मक असल्याने विद्यार्थी व वाक्यचातुर्यात निपुण होईल तसेच त्याला सर्व धर्मांची मुलभुत तत्त्वे माहीत होतील व त्याला नितिशास्त्रासारख्या विषयामुळे त्याला चांगला वाईट फरक लक्षात येईल व तो समाजात फक्त चांगल्या पध्दतीने जीवन जगण्याचा प्रयत्न करेल. व तुमचा पाल्य हा सद्गुणी बनण्यास मदत होईल असे सांगीतल्यामुळे सहाजीकच पालकांच्या मनातील तत्त्वज्ञान विषयाबद्दलचे मत सकारात्मक होईल व अशा पध्दतीने तत्त्वज्ञान विषय हा मोठया प्रमाणात वृध्दींगत होऊ शकेल.

**समाजामध्ये तत्वज्ञान विषयाप्रती आपुलकी कशी वाढेल ?**

यासाठी तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी, तत्त्वज्ञानाचे शिक्षक व पालक यांना प्रयत्न करावे लागतील. यासाठी देखील शिक्षकांचे प्रयत्न महत्वाचे आहेत. यासाठी विद्यार्थ्यांच्या घराशेजारील परिसरामध्ये त्या विद्यार्थ्यांला हाताशी धरूण शालेय विद्यार्थांला लहान लहान तत्त्वज्ञानात्मक पुस्तके देऊन त्या पुस्तकावरच त्यांची परीक्षा घ्यायची व त्यानंतर त्यांचे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक काढून त्यांना बक्षीस म्हणून तत्त्वज्ञानात्मक पुस्तके द्यावे व वर्षातून असा उपक्रम कमीत कमी तीन वेळा करावा जेणेकरून शालेय मुलांना तत्त्वज्ञान विषयाची तोंड ओळख होईल व पुढे ते मुले महाविद्यालयामध्ये तत्त्वज्ञान विषय घेतील व आपोआपच तत्त्वज्ञान विषयाचा वाढ होईल व शिक्षकांनी कधी कधी आपल्या परिसरतील शाळेमध्ये जाऊन तत्त्वज्ञान विषयाबद्दल व्याख्यान दयावे, माहिती दयावी. त्याचबरोबर शासकिय स्तरातून असे प्रयत्न करावे की, तत्त्वज्ञान हा विषय शाळेमध्ये कसा

समाविष्ट होईल यासाठी प्रयत्न करावे. एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी. मध्ये देखील तत्वज्ञान विषय अंतर्भुत करावा

अशा पध्दतीने विद्यार्थी पालक व समाज यांचामनात तत्त्वज्ञान विषयाबद्द्ल असलेला गैरसमज दुर होईल व हा विषय लहान मुलांपासुन ते मोठया माणसांपर्यंत कसा उपयोगाचा आहे हे लक्षात येईल व त्यांच्या मनात या विषयाबद्द्ल आदर, आस्था, प्रेम, महत्व वाटेल व त्यामुळे आपोआपाच हा विषय इतर शास्त्राच्या बरोबरीने किंवा त्याच्या देखील एक पाऊल पुढे या विषयाचे महत्व सर्व स्तरावर वाटेल अशी अपेक्षा मला वाटते.

**संदर्भ :-**

१. सहस्त्रबुध्दे दि. ह- शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन साधना प्रकाशन, पुणे
२. जोशी ग. ना. - भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास (पहिला खंड) मराठी तत्तज्ञान महाकोश, पुणे.